# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### बेटाळा (ता.मोहाडी, जि.भंडारा) रेती घाटावर रेतीचे अवैधरित्या उत्खनन व विक्री सुरू असल्याबाबत

**(१) १२७३ (०२-०३-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेटाळा (ता.मोहाडी, जि.भंडारा) रेती घाटावर डेपोच्या नावाखाली शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून रेतीचे अवैधरित्या उत्खनन व विक्री सुरू असल्याचे तसेच घाटावर साठवलेल्या रेतीचा उल्लेख स्टॉक पोर्टलवर दिसत नसल्यामुळे रेतीची मोठ्या प्रमाणावर चोरी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे,

मौजा- बेटाळा येथे शासकीय डेपो क्र. ११ स्थापित करण्यात आला असून त्यामधून अवैधरित्या वाळू उत्खनन व विक्री सुरू असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही. तथापि, मंजूर वाळू गटाच्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रामधून रेतीचे उत्खनन तसेच करारनाम्यामधील इतर काही अटी व शर्तींचा निविदाधारकाने भंग केला आहे.

दिनांक २१/०२/२०२५ पर्यंत सदर डेपोधारकाने मंजूर २२,६९९ ब्रास वाळू परिमाणापैकी १३,५१२.२१ ब्रास वाळूचे उत्खनन करून डेपोमध्ये साठवणूक केली आहे. तसेच डेपोमधून ११७६८.७८ ब्रास वाळूची ऑनलाईन विक्री केली असून १७४३.४३ ब्रास वाळू डेपो मध्ये विक्रीसाठी शिल्लक आहे. याबाबत सर्व नोंदी महाखनिज या ऑनलाईन प्रणालीवर घेण्यात आल्या आहेत.

(२) तथापि, डेपो धारकाने अटी व शर्तींचे पालन न केल्याचे दिसून आल्याने दिनांक २२/०२/२०२५ पासून सदर वाळू डेपोमधून वाळूची विक्री बंद केली आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील कांद्री वनपरिक्षेत्रात आडजात वृक्ष कटाई केली जात असल्याबाबत

**(२) १२८१ (०२-०३-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील कांद्री वनपरिक्षेत्रात वन कर्मचारी व लाकुड तस्करांच्या आर्थिक संगनमताने गेल्या काही दिवसांपासून आडजात वृक्षाची कटाई होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच दिवशी अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याने परिसर ओसाड पडून पर्यावरणास धोका निर्माण झाला असून वन विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अवैधरित्या लाकुड तस्करी करणाऱ्यांवर तसेच दोषी वन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१७-०३-२०२५) :** (१), (२) व (३) भंडारा वन विभागात एकूण १० वनक्षेत्र, ३९ सहवनक्षेत्र व १६२ नियतक्षेत्रांची संख्या आहे. दिनांक २०/०१/२०२५ रोजी स्थानिक दैनिक वृत्तपत्रात जांबकांद्री वनपरिक्षेत्रात वृक्षतोड झाल्याबाबत बातमी प्रकाशीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने तपासणीअंती सदर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले नाही. परंतु एकूण जांबकांद्री वनपरिक्षेत्रात जानेवारी, २०२५ या महिन्यात देऊळगाव, सोरणा व मंगरली-२ या ३ नियतक्षेत्रांचे बीट निरिक्षण करण्यात आले असता, निरक्षणअंती एकूण १० सागेत्तर वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. वृक्षतोड झालेल्या बहुतांश वृक्षांची गोलाई ६० से.मी. पेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी वन गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे. सदरची वृक्षतोड ही सरपणासाठी व शेती उपयोगासाठी स्थानिक गावकऱ्यांनी केल्याची शक्यता आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यात वाघांच्या मृत्यू होण्याच्या घटनांत वाढ झाल्याबाबत

**(३) १२८३ (०२-०३-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.सत्यजीत तांबे, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२० ते २०२४ या कालावधीत ६३१ वाघांचा मृत्यू झाल्याचे तसेच दिनांक १ ते १९ जानेवारी, २०२५ या कालावधीत ८ वाघांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे तसेच आपापसातील संघर्षातून ५ वाघांचा शिकारीमुळे, ३ वाघांचा रेल्वे आणि रस्ते अपघातात, २ वाघांचा अन्य जनावरांसाठी लावण्यात आलेल्या विजेच्या तारांचा शॉक लागल्याने व वाहनांच्या धडकेने ४ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास

आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर-बल्लारपूर रेल्वे मार्गावरही अनेक वाघांचे अपघाती मृत्यू झाले असून, दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी भंडाऱ्यातील तुमसर वनपरीक्षेत्रातील पाचरा येथे एका वाघाचे तीन तुकडे करून फेकण्यात आल्याचे निदर्शनास आले असून वाघांची शिकार करून त्यांची नखे व दात काढून नेले जात असतानाही स्थानिक वन अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाघांना मिळणाऱ्या खाद्याचे योग्य व पुरेसे व्यवस्थापन न झाल्याने ते मानवी वस्तीत येत असल्याने वाघ व मानव याच्यातील संघर्ष वाढला असून परिणामी वाघांना जेरबंद करण्याचे प्रमाणही वाढले आहे तसेच उपरोक्त घटनांमुळे व्याघ्र प्रकल्पाची सुरक्षा धोक्यात आली असून रेषीय प्रकल्पांवरील शमन उपाय योजनांकडे दुर्लक्ष झाले असल्याचेही स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात सातत्याने होणाऱ्या वाघांचे मृत्यू रोखण्यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत तसेच वाघांच्या संरक्षणासंदर्भात वन अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या दुर्लक्षाबाबत संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१३-०३-२०२५) :** (१) राज्यात सन २०२० ते सन २०२४ या कालावधीत विविध कारणांमुळे १५७ वाघांचा मृत्यू झाला आहे.

माहे जानेवारी, २०२५ ते माहे फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत नैसर्गिक कारणामुळे-८, विजेच्या धक्यामुळे-२, रस्ता / रेल्वे अपघातामुळे-३, शिकारीमुळे-१ व अज्ञात कारणामुळे-१ अशा एकूण १५ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सन २०२० ते सन २०२५ (माहे फेब्रुवारी) या कालावधीत बल्लारपूर ते काझीपेठ रेल्वे मार्गावर रेल्वे अपघातामुळे २ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

दिनांक ०६/०१/२०२५ रोजी भंडारा वन विभागातील तुमसर परिसरात वाघाचा विद्युत प्रवाहामुळे मृत्यू झाल्यानंतर सदर वाघाच्या शवाचे ४ तुकडे करुन पोत्यात भरुन जंगलात फेकल्याची घटना निदर्शनास आली आहे. सदर वाघांचे सर्व अवयव साबुत होते. प्रस्तुत प्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून ३ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रत्येक वाघ स्वत:चे स्वतंत्र अधिवास क्षेत्र ठेवत असल्याने वाघाचे बछडे मोठे झाल्यावर वाघिणीच्या अधिवास क्षेत्रातून नविन अधिवासाच्या शोधात असतात. सद्य:स्थितीत पोषक वातावरणामुळे व्याघ प्रकल्प व इतर अधिवास क्षेत्रामध्ये वाघांची संख्या वाढत असल्याने नविन तरुण वाघांना अधिवास क्षेत्र कमी पडत असून सदर वाघ भ्रमणमार्गाद्वारे व्याघ्र प्रकल्पाबाहेर पडून अधिवासाच्या शोधात संचार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्षाचे प्रमाण वाढले आहे.

मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

नविन रेषिय प्रकल्प उदा. रस्ते, कालवे, रेल्वेमार्ग निर्माण करताना ते प्रकल्प जर वन्यजीव बहुल क्षेत्रामधून जात असतील तर त्या रेषीय प्रकल्पात संम्पुर्ण उपशमन योजना तयार करुन अंमलात आणण्यात येतात. उपशमन योजना प्रस्तावित केल्यशिवाय सदर प्रकल्पांना मान्यता प्रदान करण्यात येत नाही.
(४) व (५) वाघांच्या संरक्षणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

ताडोबा-अंधारी, पेंच, मेळघाट व नवेगाव-नागझिरा या ४ व्याघ्र प्रकल्पामध्ये विशेष व्याघ्र दलाची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्हा स्तरावर इतर विभागाशी समन्वय करुन शिकार प्रतिबंधासाठी पोलीस अधीक्षक यांचे अध्यक्षतेखाली व्याघ्र कक्ष (Tiger Cell) कार्यरत आहेत.

विद्युत प्रवाहामुळे शिकार रोखण्यासाठी वनविभाग व विद्युत वितरण विभागाकडून संवेदनशील क्षेत्रात संयुक्त गस्त करण्यात येते.

संवेदनशील भागात (विशेषत: व्याघ्र प्रकल्पात) Mstripes ॲपचा वापर करुन क्षेत्रिय कर्मचाऱ्यांद्वारे नियमित गस्ती करुन वन्यप्राण्यांचा मागोवा घेण्यात येतो.

---

## राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क स्थापन करण्याबाबत

**(४) १९०४ (२५-०२-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डेटा सेंटर पार्कची स्थापना करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणारे आपले राज्य हे देशातील पहिले राज्य असून हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क स्थापन करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बैठकीत मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृत्रिम बुध्दीमत्तेचा (AI) तंत्रज्ञानाचा भविष्यातील वाढता वापर लक्षात घेता त्याकरीता डेटा सेंटरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात ऊर्जेचा वापर होवून जागतिक तापमान वाढ (ग्लोबल वॉर्मिंग)ची समस्या अधिक व्यापक होण्याची शक्यता असताना हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कची निर्मिती झाल्यास डेटा सेंटरकरीता लागणारी ऊर्जा व त्यामुळे निर्माण होणारी ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येचे आपोआपच निराकरण होणार असल्यामुळे या क्षेत्रातील बहुराष्ट्रीय व जागतिक स्तरावरील नामांकित कंपन्यांकडून राज्यात कोट्यवधी रूपयांची गुंतवणूक होवून हजारोच्या संख्येने रोजगार निर्माण होवू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू डेटा सेंटर पार्कची स्थापना करण्यास येत असलेल्या अडचणी दूर करुन या डेटा सेंटर पार्कची स्थापना करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१२-०३-२०२५) :** (१) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ०४/१०/२०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये "राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कस स्थापित करणेबाबत" प्रस्तावास दिलेल्या मा.मंत्रीमंडळाच्या प्राप्त मान्यतेनुसार उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र. मातंधो-२०२४/ प्र.क्र.१३८/ उद्योग-२, दिनांक ०९/१०/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णानुसार राज्यात तीन हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कसना मंजूरी व अतिरिक्त प्रोत्साहने मंजूर करण्यात आली आहेत.

(२) देशाची अर्थव्यवस्था ७ टक्क्यांहून अधिक दराने वाढत असून डेटा प्रोसेसिंग आणि स्टोरेज साठी बाजारपेठेत उल्लेखनीय मागणी आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) च्या आगमनाने डेटा स्टोरेज आणि प्रक्रियेची आवश्यकता अनेक पटींनी वाढणार आहे. परंतु याच बरोबर डेटा सेंटर द्वारे मोठ्या प्रमाणावर वापरण्यात

येणाऱ्या पारंपारिक स्रोतापासून निर्माण झालेल्या ऊर्जेमुळे ग्लोबल वॉर्मिंग ची समस्या अधिक व्यापक होण्याची शक्यता आहे. या कारणास्तव अनेक बहु राष्ट्रीय दिग्गज कंपन्यांनी उदा. Amazon, Google, Microsoft इ. यांनी त्यांचा डेटा हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क मध्ये स्थापन करण्याचे संकेत दिले आहे. सबब, हरित एकात्मिक डेटा सेंटर मुळे ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येचे निराकरण होण्यास मदत होईल. तसेच या क्षेत्रातील बहुराष्ट्रीय व जागतिक स्तरावरील नामांकित कंपन्यांकडून राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होवून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्यास मदत होईल.
(३) व (४) राज्यात उद्योग स्थापन करण्यात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून व्यवसाय सुलभतेसाठी शासनाने मैत्री कायदा-२०२३ अंमलात आणला आहे. तसेच राज्यातील उद्योगांकरीता सर्व मंजुरी, परवानग्या आणि जी टू बी सेवांसाठी- मैत्री २.० या नवीन पोर्टलचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. राज्यात तीन हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क उभारणेकरीता अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय करणेसाठी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून यांतर्गत टियर ४ श्रेणीच्या व किमान रुपये १०,००० कोटी स्थिर भांडवली गुंतवणूक असणाऱ्या प्रथम तीन पात्र हरित एकात्मिक डेटा सेंटर करीता १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी, २० वर्षांकरीता विद्युत शुल्क माफी, १० वर्षाकरीता वीज दर अनुदान आणि राज्य वस्तू व सेवा कराच्या स्वरुपात औद्योगिक प्रोत्साहन अनुदान ही प्रमुख अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

धोरणांतर्गत नवी मुंबई येथे टियर चार श्रेणीचे दोन हरित एकात्मिक डेटा सेंटर स्थापित करण्यास शासनाने मंजूरी दिली असून, या अंतर्गत एकूण प्रस्तावित गुंतवणूक रुपये ६५००० कोटी इतकी आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर आणि उपनगरात टँकरमाफियांकडून नागरिकांची लूट करण्यात येत असल्याबाबत

**(५) ११५६१ (२०-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर आणि उपनगरात अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे परंतु टँकरमाफियांकडून एका टँकरसाठी पाच हजार रुपये आकारले जात असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टँकरमाफियांकडून नागरिकांची होत असलेल्या लूटप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुसार टँकरमाफियांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, तसेच ज्या ठिकाणी नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो त्या ठिकाणच्या नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०४-२०२५) :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहरात व उपनगरात टँकरमाफियाकडून एका टँकरसाठी पाच हजार रूपये आकारले जात असल्याची कोणतीही तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली नाही.
(२) टँकरमाफियांकडून नागरिकांची लूट होत असल्याबाबतची तक्रार महानगरपालिकेकडे प्राप्त नसल्याने

याबाबतची चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नागरिकांकडून अथवा संस्थाकडून टँकरची मागणी केल्यास अथवा अपुरा / विस्कळीत पाणीपुरवठा होत असल्यास, त्यांना महानगरपालिकेच्या टँकरद्वारे अथवा सदर टँकर उपलब्ध नसल्यास, अर्जदारास आरोग्य विभागाने प्रमाणित केलेला टँकर आणण्यास परवानगी दिली जाते व त्या टँकरमध्ये विहीत दर / शुल्क आकारुन महानगरपालिकेच्या पाणी भरणा केंद्रात पाणी भरून दिले जाते. तसेच, पाणी टंचाई असणाऱ्या भागात नवीन जलवाहिन्या टाकून व जलजोडण्या करुन नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी "ॲक्सेस कंट्रोल रोड" प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) १६०४८ (२९-१२-२०२२) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एमएमआरडीएने "ॲक्सेस कंट्रोल रोड" प्रकल्प हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे, सदर प्रकल्पासाठी अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे व किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन "ॲक्सेस कंट्रोल रोड" प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०२-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पुर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाबाबतचा "ॲक्सेस कंट्रोल रोड" प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत प्रस्तावित होता.सद्य:स्थितीत दोन्ही महामार्ग मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत. सबब, प्रस्तावित "ॲक्सेस कंट्रोल रोड" प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या शिफारशींची पडताळणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी बांधवांच्या जमिनी प्रशासकीय स्तरावर बिगर आदिवासींच्या नावे होत असल्याबाबत

**(७) १७४८८ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ च्या कलम ३ व ४

तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ३६ व ३६ -अ नुसार आदिवासींच्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय व शासनाच्या मान्यतेशिवाय बिगर आदिवासींकडे कोणत्याही कारणास्तव हस्तांतरीत करता येत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींच्या मृत्यूपत्राच्या आधारे आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत करता येत नसतानाही सदर जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत करण्यात येऊन आदिवासींना भूमिहीन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चीचारी (ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा) येथील आदिवासींची जमीन बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त नमूद कायद्यान्वये आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत न करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०२५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) तत्कालीन प्रभारी तहसिलदार, संग्रामपूर यांनी काही खातेदारांचे जमिनीचे ७/१२ उताऱ्यातील इतर अधिकारात कलम ३६ व ३६ अ नुसार असलेल्या नोंदी कमी करताना सखोल चौकशी केली असल्याचे दिसून न आल्याने सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद यांचे मार्फेत, दिनांक २१/०७/२०२० रोजी त्रिस्तरीय समिती व पुनश्च दिनांक १२/०२/२०२१ रोजी दुसरी समितीव्दारे सदर प्रकरणांची चौकशी केली आहे.

उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद यांच्या न्यायालयात तसेच उपविभागीय अधिकारी, मेहकर यांच्या न्यायालयात या प्रकरणी चौकशी करून आदेश पारित केले आहेत.

सदर आदेशान्वये गैरआदिवासींना सन २०२२ मध्ये जमीन हस्तांतरण करण्यात आलेले फेरफार रद्द करुन सदर जमीन आदिवासी खातेदारांच्या नावाने पुर्ववत करण्यात आलेले आहेत.
(५) प्रस्तुत प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे अपील दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील ९ वी व १० वीच्या वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकांना ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत

**(८) १९४५८ (०८-०८-२०२३) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील ९ वी व १० वी वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकांना ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीची सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील ९ वी व १० वीच्या वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकांना ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१२-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

माध्यमिक शिक्षक संवर्गाच्या ऑनलाईन बदलीसंदर्भात कोणतेही धोरण नाही. सबब, राज्यात जिल्हा परिषदेअंतर्गतच्या माध्यमिक शिक्षक संवर्गाची संख्या अत्यंत मर्यादीत स्वरुपाची असल्याने माध्यमिक शिक्षकांच्या बदल्या ह्या ग्रामविकास विभाग क्र.जिपब-४१४ / प्र.क्र.११२ / आस्था-१४, दिनांक १५/०५/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदी व अटी शर्ती नुसार जिल्हा परिषदस्तरावरुन ऑफलाईन पध्दतीने करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात आद्य क्रांतिकारक भगवान “बिरसा मुंडा” यांचा पूर्णाकृती शिल्प उभारण्याबाबत

**(९) २१६४२ (०३-०१-२०२४) श्री.सचिन अहिर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय परिसरात आद्य क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचे पूर्णाकृती शिल्प उभारण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे दिनांक १५/११/२०२२ रोजी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२१-०४-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९, दिनांक ०२/०५/२०१७ अन्वये राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास परवानगी देण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. त्यानुसार, राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील प्रकल्प कार्यालयात दर्शनीय भागात आद्यक्रांतिकारक बिरसा मुंडा यांचे पुर्णाकृती शिल्प उभारण्याबाबत जर विशिष्ट मागणी करण्यात आली तर सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रकरण तपासण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमदार स्थानिक विकास निधी अंशत: अनुदानित शाळांच्या विकासाकरीता वितरीत करणेबाबत

**(१०) २३०७२ (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंशत: अनुदानित शाळांच्या विकासाकरीता आमदार स्थानिक विकास निधी मधून निधी वितरीत करण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आमदार स्थानिक विकास निधी अंशत: अनुदानित शाळांच्या विकासाकरीता वितरीत करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२१-०३-२०२५) : (**१) नाही. हे खरे नाही.

अंशत: अनुदानित शाळांच्या विकासाकरीता आमदार स्थानिक विकास निधी मधून निधी वितरीत करण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुंबईतील उपकर प्राप्त इमारती व चाळींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र कायदा व प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

**(११) २३१४० (२२-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे : दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक १७६०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात आजही जवळपास १५ हजार जीर्ण उपकर प्राप्त इमारती व चाळी उभ्या असून त्याशिवाय पूर्व व पश्चिम उपनगरातही खूप मोठ्या प्रमाणात जुन्या इमारती असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक धोरण व विकास नियंत्रण नियमावलीत अनेक बदल करूनही पुनर्विकास योजनेची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकासाचा उत्तम पर्याय असून अनेक अडथळे येत असल्यामुळे साधी नोंदणी करण्यासाठी देखील अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रलंबित असलेली पुनर्विकासाची कामे, जीर्ण उपकरप्राप्त इमारती व चाळींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र कायदा करून प्राधिकरण स्थापन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०३-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींचा स्वयंपुनर्विकासाची प्रक्रिया व परवानगी सुलभीकरणासाठी गृहनिर्माण विभागाने दिनांक १३/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध

शिफारशी केल्या आहेत.सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व पुनर्विकासाच्या दृष्टीने महसूल व वन विभाग, नगरविकास विभाग, सहकार विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी विविध सवलती / उपाय योजना केल्या आहेत.

(४) मुंबई शहरातील धोकादायक घोषीत उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास तसेच विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (६), ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत मालक / विकासकाने अर्धवट अवस्थेत सोडलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकास प्रकल्पाबाबत म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम ७७,७९ (अ), ९१ (अ) व ९५- अ च्या सुधारणेनुसार करावयाच्या कार्यवाही बाबत दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.सदर सुधारणेच्या अनुषंगाने धोकादायक घोषीत उपकरप्राप्त इमारती तसेच रखडलेले / अधर्वट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्पाबाबत म्हाडामार्फत आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे जांब (ता.शिरुर कासार, जि.बीड) येथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याबाबत

**(१२) २३१६० (२२-०७-२०२४) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जांब (ता.शिरुर कासार, जि.बीड) येथील शेतकऱ्यांची जमीन सन २००२ मध्ये जलसंपदा विभागाने संपादीत करुन अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप एकूण किती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही तसेच नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१३-०३-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर जमीन जलसंपदा विभागाने संपादित केली नसून जिल्हा परिषद,लघुपाटबंधारे विभागाकडून जमीन संपादित करण्यात आली असून संबंधित शेतकऱ्यांना जमिनीचा नुकसान भरपाई मावेजा अद्यापपर्यंत मिळालेला नाही.

(२) गाव तलावासाठी एकूण १९ शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असून भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) भुसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी (समन्वय) बीड यांचेकडे सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना मावेजा वाटप होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल व निधी प्राप्त होताच संबंधित शेतकऱ्यांना मावेजाची रक्कम उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडून निधी वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पंतप्रधान आवास योजनेचा केंद्र शासनाकडून प्रलंबित असलेला निधी मिळणे बाबत

**(१३) २३३९१ (२२-०७-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील घरकुलाचे स्वप्न साकारणाऱ्या पंतप्रधान आवास योजनेचे केंद्र शासनाकडून ६ हजार ४५२ कोटी २० लाख रुपयांचा निधी राज्याला मिळाला नसल्यामुळे सर्वसामान्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार नसल्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी,२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी केंद्र शासनाकडून निधी मिळवून सर्वसामान्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०६-२०२५) :** (१) व (२)प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या घटकांतर्गत मंजूर घरकुलांसाठी केंद्र शासनाकडून रुपये ४४६२.७२ कोटी एवढा निधी प्राप्त झाला असून, सदर १०० % निधी (SNA) सुकाणू अभिकरणाला वितरीत करण्यात आला आहे, त्यापैकी रुपये ४२३०.७९ कोटी एवढा निधी खर्च झाला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यात परिचर्या संचालनालय स्थापन करण्याबाबत

**(१४) २३५८३ (२०-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनसामान्यांच्या आरोग्यासाठी महत्वाची सेवा बजाविणाऱ्या परिचारिका, वॉर्डबॉय इत्यादीं सारख्या महत्वाच्या पदांचे संचलन करण्याकरीता राज्यात परिचर्या संचालनालय स्थापन करण्याबाबत केंद्रीय आयुष मंत्रालयाने सूचना केली असल्याचे माहे, एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने परिचर्या संचालनालय स्थापन करण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१९-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यात स्वतंत्र परिचर्या संचालनालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयाने दिनांक १३/०८/२०२४ शासनास सादर केला असून सदर प्रस्तावानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केरवडे (ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग) येथील पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या जमिनी मालकी हक्काने मिळण्याबाबत

**(१५) २३९३४ (१८-०७-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानगांव खोऱ्यातील केरवडे (ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग) येथील पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या जमिनी कायम मालकी हक्काने मिळाव्यात यासाठी श्रमिक मुक्ती दलाने उपवनसंरक्षक यांच्या कार्यालयावर माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम सहाप्रमाणे काढलेला जाहीरनामा मागे घेऊन पिढ्यां-पिढ्या कसत असलेल्या जमिनी वननिवासी लोकाना कायमस्वरुपी मालकी हक्काने मिळण्यासाठी वन जमाबंदी अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई कार्यालयात सादर केलेल्या निवेदना संदर्भात अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याने तसेच त्यांच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्यामुळे आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विषयासंदर्भात आदिवासी व वननिवासी लोकांवर जिवीताचा अधिकार या मूलभूत अधिकारावर गदा येणार असल्याने जाहीरनामा लवकरात लवकर मागे घेण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक (१९-०३-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अन्वये मौजे केरवडे येथील अधिसूचीत क्षेत्राची चौकशी करण्यासाठी वनजमाबंदी अधिकारी, कोकण यांनी दिनांक १५/१२/२०२३ रोजी कलम ६ अंतर्गत जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. प्रसिध्द करण्यात आलेला जाहीरनामा मागे घेण्याची तरतूद भारतीय वन अधिनियम १९२७ मध्ये नाही. तथापि, सदर जाहीरनाम्याच्या अनुषंगाने ग्रामस्थांनी निवेदने सादर केली आहेत. त्यानुसार जाहीरनाम्यातील क्षेत्राबाबतच्या दाव्यांची वनजमाबंदी अधिकारी यांच्याव्दारे जागेवर जाऊन चौकशी करुनच तद्नंतर भारतीय वन अधिनियमाच्या कलम ११ ते १६ अन्वये आदेश पारित करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील मुख्य वनसंरक्षक कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना वनरक्षक पदोन्नतीपासून वंचित रहावे लागले असल्याबाबत

**(१६) २३९४४ (१८-०७-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुख्य वन संरक्षक कार्यालयामध्ये असलेल्या अधिक्षक व मुख्य लेखापाल (आस्थापना जमीन विभागाची जबाबदारी) कार्यालयात लिपिक संवर्गामध्ये कार्यरत असणाऱ्या ११ कर्मचाऱ्यांना शासन निकषानुसार वनरक्षक संवर्गात सामावुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विहित कालावधीत न पाठविल्यामुळे सदर कर्मचारी पात्र असतानासुध्दा वनरक्षक संवर्गात सामावून घेण्याच्या संधी पासून वंचित रहावे लागले

असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सन २०१९,२०२०,२०२१,व २०२२ मध्ये नाशिक, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील वन विभागाच्या अख्यत्यारित असलेल्या लिपिकांनी केलेले अर्ज संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत प्रशासनाकडे पाठविल्याने बक्षी समिती अहवाल येण्यापूर्वीच त्यांना लिपिक संवर्गातून वनरक्षक संवर्गात समाविष्ट करण्यात आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,मुख्य वन संरक्षक कार्यालय ठाणे येथे कार्यरत असलेले कर्मचारी व निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अपमानास्पद वागणूक देत असल्याचे तसेच नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांची बदली तीन वर्षानंतर पात्र असतानाही वरिष्ठांच्या मर्जीत असलेल्यांची बदली करण्यात येत नसल्याने सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ फेब्रुवारी,२०२४ रोजी मुख्य वन संरक्षक, ठाणे यांच्याकडे दिले आहे,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे विभागातील ११ लिपिकांना वनरक्षक संवर्गात सामावून घेण्याबाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली तसेच कार्यालय अधिक्षक व मुख्य लेखापाल, आस्थापना यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक (०२-०४-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे. नाशिक वनवृत्तामध्ये लिपिक संवर्गातून वनरक्षक संवर्गात संवर्ग बाह्य बदलीने सामावून घेण्यात आलेले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) यासंदर्भात अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा.नागपूर यांनी वनविभागातील लिपिक व वाहनचालक संवर्गातून वनरक्षक या सवंर्गात संवर्गबाह्य बदली करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन मार्गदर्शन होण्याची विनंती केली होती. त्यानुषंगाने सद्य:स्थितीत शासनाचे प्रचलित नियम विचारात घेता, अशी कार्यवाही करता येणार नाही, असे शासन पत्र दिनांक २३/०१/२०२४ अन्वये त्यांना कळविण्यात आले आहे. यासंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.६४३/२०२४ दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) २४२३३ (२०-०७-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयामध्ये प्राध्यापक ते सहाय्यक प्राध्यापकांच्या ३७ जागा रिक्त असून सदर रिक्त असलेल्या जागा भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून शासनाने सदर प्रस्तावास मान्यता दिल्यास सदरच्या ३७ जागा ह्या कंत्राटी पध्दतीवर भरण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंत्राटी पध्दतीवर भरण्यात येणाऱ्या या पदांबाबत शासनाने कोणकोणत्या अटी व

शर्ती लागू केल्या आहेत,
(३) तसेच उक्त कंत्राटी प्राध्यापकाचे वेतनमान ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२७-०३-२०२५) :** (१) हे खरे नाही.

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेतील भारतीय दंत परिषदेच्या मानकांनुसार एम.डी.एस. अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता २४ वरुन ४८ करण्याकरीता वर्ग-१ व वर्ग-२ चा (प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक) ३७ नविन पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील प्रसाधनगृहांच्य वाटपात अनियमितता झाली असल्याबाबत

**(१८) २४२६१ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशी, येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील सार्वजनिक शौचालय वाटपात अनियमितता झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एपीएमसी मार्केट वरील संचालक व आजी-माजी अधिकाऱ्यांनी नियमबाह्य पध्दतीने आपल्या मर्जीतल्या संस्थांना वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील प्रसाधन गृहाचे वाटप करून एपीएमसी मार्केटचे कोटयवधी रुपयांचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रसाधन गृहाचे वाटपात अनियमितता करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (११-०४-२०२५) :** (१), (२) व (३) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी, नवी मुंबई येथील निविदा प्रक्रियेनुसार झालेल्या प्रसाधनगृहाचे वाटप, निविदा प्रक्रियेविना झालेले नुतनीकरण व मुदतवाढ यामध्ये बाजार समितीचे संचालक व अधिकारी यांनी केलेली अनियमितता व आर्थिक गैरकारभार संदर्भात सहाय्यक पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा), नवी मुंबई यांनी केलेल्या चौकशीतील निष्कर्ष व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण), मुंबई विभाग यांनी दिलेल्या तक्रारीनुसार एपीएमसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे दिनांक ११/११/२०२३ रोजी गुन्हा रजिस्टर

क्र.४२४/२०२३, भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ सह लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १३(२) अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबईशी निगडीत एकूण ८ आरोपींविरुध्द दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ८ आरोपींना मा.न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. प्रसंगत: सदर गुन्ह्यात तपासाअंती नव्याने एकूण ५ व्यक्तींना आरोपी करण्यात आले असून त्यांना अटक करण्यात आली होती. मात्र सद्य:स्थितीत सदरहू ५ आरोपींना जामीन मंजूर केला असल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी अहवालात नमुद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यात खरीप पिकाच्या हंगामात युरिया खताची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१९) २४३८९ (२९-११-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात खरीप पिकाच्या हंगामात मोठ्या प्रमाणात युरिया खताची टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होऊन तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना युरिया खताचा पुरवठा लवकरात लवकर करण्याबाबत तसेच भविष्यात युरिया खताची टंचाई निर्माण होणार नाही या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२१-०४-२०२५) :** (१) नाही
(२) रायगड जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ या काळातील खरीप हंगामात युरिया खताचे ११५०० मे.टन मंजूर आवंटनाच्या तुलनेत १२०१९.१८५ मे.टन युरिया खताचा पुरवठा झाला होता.तसेच खरीप २०२४ मध्ये रायगड जिल्ह्यात ८२८.३६० मे.टन युरिया खताचा संरक्षित साठा करण्यात आलेला होता व मागणीप्रमाणे सदर संरक्षित साठा मुक्त करण्यात येवून शेतकऱ्यांना युरिया खताचा पुरवठा करण्यात आला होता.खरीप २०२५ मध्ये देखील खताचा संरक्षित साठा करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे महापे, नवी मुंबई (जि.रायगड) येथील टीसीसी औद्योगिक क्षेत्रातील खाजगी वन जमिनीच्या भूखंडाची बेकायदेशीररित्या विक्री केल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(२०) २४३९४ (१६-०१-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे महापे, नवी मुंबई (जि.रायगड) येथील टीसीसी औद्योगिक क्षेत्रातील खाजगी वन जमीन सर्व्हे नंबर १३३, १३४, १३७, १३८, १३९ व १४२ या जमिनींची वन खात्याची परवानगी नसतानाही विक्री करण्यात आल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी मा.वनमंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे वन विभाग यांच्याकडे असलेल्या नोंदीनुसार भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ३५ (१)(३) व शासन राजपत्रातील अधिसूचनेनुसार विशेष प्रयोजनाकरीता वनसंरक्षणासाठी नोटीस प्रसिध्द केल्याने मौजे महापे येथील जमीन सर्व्हे नं. १३३, १३४, १३७, १३९ व १४२ या क्षेत्राचा अंतर्भाव असताना महामंडळाने सदर जमिनीची वनखात्याची कोणतीही परवानगी न घेता परस्पर विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनासाठी आरक्षित असलेली जमीन संपुष्टात येत असतानाही उद्योग विभागाचे व वन विभागाचे त्याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-०४-२०२५) :** (१)अशा प्रकारचे कोणतेही निवेदन मऔवि महामंडळास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

मौजे महापे येथील जमीन सर्व्हे नं. १३३,१३४,१३७,१३८,१३९ व १४२ या जमिनीं म म.औ.वि. महामंडळाकरीता सन १९६६ मध्ये संपादित केलेल्या असून, शासनाकडून दिनांक २३/०५/१९७२ रोजी सदर जागेचा ताबा म.औ.वि. महामंडळास औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी प्राप्त झालेला आहे. तद्नंतर महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २२/०२/२००५ अन्वये सर्व्हे नं. १३३, १३४,१३७,१३८,१३९ व १४२ या जमिनींच्या सर्व्हे नंबरवर दिनांक ०५/१०/२००५ रोजी सदर जमीन महाराष्ट्र शासन खाजगी वने अशी नोंद फेरफार सदरी लावण्यात आलेली आहे.

सदर खाजगी वने अशी नोंद लावण्यापूर्वी शासन अधिसूचना दिनांक १९/१२/१९६३,दिनांक ११/१०/१९६३, दिनांक ३०/०३/१९६४, दिनांक २४/०३/१९६६ व दिनांक ०५/०२/१९९० नुसार सदर क्षेत्राचे म.औ.वि. महामंडळाकरीता भूसंपादन करण्यात आले असून, सदर क्षेत्राचा ताबा म.औ.वि. महामंडळ, मुंबई या शासकीय यंत्रणेकडे आहे. त्यानुसार म.औ.वि. महामंडळाकडून सदर जागेवर भूखंडाचे नियोजन करुन सन २००५ पूर्वी वाटप करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.